www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-४६ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

# महिलांना अपमानास्पद वागणूक देणारे काँग्रेस शहराध्यक्ष शेख युसुफ यांना घरी बसवा - दिपाली मिसाळ यांची खदखद

**महिलांना अपमानास्पद वागणूक देणारे काँग्रेस शहराध्यक्ष शेख युसुफ यांना घरी बसवा अशी खदखद शहर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या दीपाली मिसाळ यांनी व्यक्त केली. तसेच नेहमीच होणाऱ्या अपमानास्पद वागणूकीमुळे अनेक दिवसांपासून दडलेल्या भावनांना वाट मोकळी करून देत अट्टल मतच्या प्रतिनिधी संवाद साधला.**

दिनेश परदेशी (अट्टल मत प्रतिनिधी)

एकीकडे सत्कार होत असताना मात्र दुसरीकडे शहर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी तसेच महिला कार्यकर्ता यांच्या मनात खदखद होते की, महिलांना व्यासपीठावर स्थान का दिले जात नाही? महिलांची अवहेलना का होते? नेहमीच का डावलले जाते? सत्कार सुरू असताना अचानक शहर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या दीपाली मिसाळ यांनी व्यासपीठावरील सर्व पदाधिकाऱ्यांना

माईकव्दारे सांगितले की, आम्हा महिलांनाही नवीन जिल्हाध्यक्षांचा सत्कार करायचा आहे आम्हालाही दोन मिनिट वेळ द्यावा परंतु पाहिजे तसा त्यांना प्रतिसाद मिळाला नाही काही वेळाने महिला काँग्रेसच्या काही महिलांना घेवून त्यांनी जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांचा सत्कार केला.

यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करू दिली. त्या म्हणाल्या की, आदरणीय सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे साहेब ांच्या नेतृत्वामध्ये आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नेतृत्वामध्ये ज्या नियुक्त्या झाल्या आहेत. त्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मनापासून अभिनंदन करते. परंतु महिला काँग्रेसची एक पदाधिकारी तसेच कट्टर कार्यकर्ती होण्याच्या नात्याने या ठिकाणी एक खंत व्यक्त करते की, व्यासपीठावर एकही महिला पदाधिकारीला बसण्यासाठी स्थान दिले जात नाही. ही किती मोठी शोकांतिका आहे. गेल्या तीन वर्षांपासून प्रभारी शहराध्यक्ष शेख युसूफ आहेत. त्यांच्या नेतृत्वामध्ये महिला काँग्रेस ही सतत घटत गेलेली आहे. महिला काँग्रेस ही शून्य झालेली आहे. आम्ही अनेकदा प्रयत्न केला आहे की, महिला काँग्रेसला एकत्र आणण्याचा, महिलांना भरपूर पदे देण्याचा मात्र ज्या पद्धतीने प्रभारी शहराध्यक्ष शेख युसूफ महिला काँग्रेसला वागणूक देतात. त्यामुळे महिला काम करीत नाही. मोजक्याच बोटावर मोजण्या इतक्या महिला काम करतात याची सर्व जबाबदारी ही शेख युसुफ यांचीच आहे.

**तुमच्यात काही वैयक्तिक दुश्मनी आहे का?**

त्यावर दीपाली मिसाळ म्हणाल्या माझी कुणाशी वैयक्तिक दुश्मनी आहे. परंतु माझी एक मागणी आहे की, आम्हाला लवकरात लवकर एक नवीन अध्यक्ष द्यावा. जो सर्व समाजाला घेवून चालेल व महिलांना आदरपूर्वक वागणूक देईल. संपूर्ण देशात, महाराष्टात महिलांना चांगली वागणूक दिली जाते. परंतु छत्रपती संभाजीनगर शहरातील काँग्रेस कमिटीमध्ये महिलांना डावलण्याचे काम जोमाने होते. ज्या महिला चांगले काम करत आहे त्यांच्याबद्दल अपशब्द वापरले जातात. हे देखील फक्त तीन वर्षातच होत आहे. शहराध्यक्ष शेख युसूफ यांना नियुक्ती दिली आणि तेव्हापासून महिलांचे खच्चीकरण होते तसेच अपशब्द वापरण्याचे काम होते. आमची मागणी आहे की, लवकरात लवकर शेख युसुफ यांना बदलण्यात यावे.अन्यथा महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने मी सर्व महिलांना घेवून शहरामध्ये आंदोलन करणार आहे. हे आंदोलन गल्ली ते दिल्ली असेल. हे आंदोलन प्रत्येक शहरात, प्रत्येक जिल्ह्यात महिला भगिनीं ना मान दिला पाहिजे यासाठी असेल. राहुल गांधींच्या विचारांना फॉलो केले पाहिजे. काँग्रेसच्या विचारांना स्वीकारले पाहिजे. ज्या शहराध्यक्षांना तसेच जे नेतृत्व करतात त्यांना महिलांना घेवून चालायचे नसेल त्यांनी आपले गठोडे घेवून घरी बसावे.

### पक्षामध्ये गटबाजी चालू आहे का?



“काँग्रेस पक्षामध्ये आमच्यासारख्या छोटे कार्यकर्ते मनापासून एकनिष्ठेने काम करतात मात्र दुहेरी स्वभावाचे म्हणजेच निवडणूक काळात काँग्रेसमध्ये राहून पाठीमागून इतर पक्षाच्या उमेदवाराचे काम करणारे शहराध्यक्ष शेख युसूफ मात्र गेल्या तीन वर्षापासून पदावर बसून आहेत. एकीकडे सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी राहुलजी, सोनियाजी, खरगेजी संसदेत फाईट करीत आहेत. मात्र ज्या पद्धतीने शेख युसुफ महिलांना वागणूक देत आहेत ते योग्य नाही.

**- दीपाली मिसाळ**

### ....त्यांचा गैरसमज झाला असावा



“महाराष्ट्र महिला काँग्रेस ही बरखास्त झालेली. लवकरच नवीन कार्यकारीणी वरिष्ठांच्या निर्णयानुसार, मार्गदर्शनानुसार होईल. माझे सर्वांशी चांगले संबंध आहेत. अन् महिलांशी तर मी नेहमीच आदरपूर्वक वागत आलो आहे मला नाही माहिती ते असे कसे वागत आहेत. माझी त्यांच्याशी व माता भगिनीं शी कोणत्याही प्रकारची वैर नाहीच आहे. मला वाटते दीपाली ताई यांचा काही तरी गैरसमज झाला असावा.

**- शेख युसुफ, शहर अध्यक्ष**
शहर जिल्हा काँग्रेस कमिटी

## कार्यकारिणीवर नियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ




छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, जिल्हा काँग्रेस कमिटी, अल्पसंख्याक विभाग व NSUI च्या प्रदेश कार्यकारणीवर नियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ आज पक्ष कार्यालय गांधी भवन येथे करण्यात आला. येणाऱ्या नगर परिषदा, महानगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्ष आपला झेंडा फडकावेल, असे मत खा.डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केले. यावेळी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांनी आपला जिल्हाध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला व येणाऱ्या काळात जिल्ह्यात पक्ष जोमाने वाढवण्यासाठी काम करणार असे मत व्यक्त केले.

# ‘दहा लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याची दोरी तुमच्या हाती:’ जिल्हाधिकारी स्वामी यांचे महिला सक्षमीकरण कार्यशाळेत आवाहन

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

शिक्षकांनो जिल्ह्यातील दहा लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याची दोरी तुमच्या हाती आहे. त्यांना जगायचे कसे, संकटांना सामोरे कसे जायचे हे शिकवा. संस्कारक्षम विद्यार्थी घडवा. असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज महिला सक्षमीकरण व संवाद कार्यशाळेत केले. कन्नड येथे आज महिला सक्षमीकरण व संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार विद्याचरण कडवकर, शिक्षणाधिकारी आश्विनी लाटकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती चव्हाण, विस्तार अधिकारी जे व्ही चौरे, गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर यावेळी उपस्थित होते.






नाचनवेल केंद्रातील विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी स्वामी यांचे औक्षण करून स्वागत केले. दीपप्रज्वलनानंतर शिवराय केंद्र हतनूर येथील विद्यार्थ्यांनी दशसूत्री पथनाट्य सादर केले.

प्रास्ताविक माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांनी केले. तर गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर, विस्तार अधिकारी लईक सोफी यांनीही यावेळी उपस्थित शिक्षिकांशी संवाद साधला. कार्यक्रमास तालुक्यातील जिल्हा परिषद व खाजगी शाळेतील महिला शिक्षक, शाळाप्रमुख, मुख्याध्यापक, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन योगेश पाटील यांनी केले.

# ‘सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय?’

## संजय शिरसाट यांचे बेताल वक्तव्य

अकोला : काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य आणि हाती सिगारेट घेतलेला व्हिडीओ व्हायरल झाल्याने चर्चेत असलेल्या मंत्री संजय शिरसाट यांनी शनिवारी आणखी एक वादग्रस्त वक्तव्य केले आहे. कितीही रक्कम मागा, आपण लगेच मंजूर करू, सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय, असे शिरसाट यांनी म्हटले आहे. कॅबिनेट बैठकीत सर्वच मंत्र्यांना मोजून मापून बोलण्याचे आदेश दिले आहेत. त्यामध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या मंत्र्यांना नाव न घेता सुनावले होते. मुख्यमंत्र्यांनी कडक तंबी दिल्यानंतरही महायुती सरकारमधल्या मंत्र्यांच्या वादग्रस्त विधाने काही केल्या थांबता थांबताना दिसून येत नाहीत. आता पुन्हा एकदा शिरसाट यांच्या एका वादग्रस्त वक्तव्याचा शुक्लकाष्ठ सरकारच्या मागे लागण्याची चिन्ह आहेत.

संपादकीय

# 'वर्क फ्रॉम होम' जागतिक संकल्पना अडचणीत?

करोना महामारीच्या काळामध्ये जास्त लोकप्रिय झालेली 'वर्क फ्रॉम होम' म्हणजे 'घरून काम करण्याची' संकल्पना जागतिक सर्वेक्षणात अडचणीची झालेली दिसते. जगातील ४० प्रमुख देशांमधील १६ हजार पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची पाहणी केली असता त्याचे निष्कर्ष धक्कादायक आहेत. या पाहणीचा घेतलेला वेध. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी व जर्मनीतील आयएफओ इन्स्टिट्यूट यांनी २०२४-२०२५ या वर्षात ४० देशांमध्ये 'जागतिक कामकाज व्यवस्था सर्वेक्षण' पहाणी केली. त्यात १६ हजार पेक्षा जास्त पदवीधर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. एकेकाळी कामगारांचे भविष्य म्हणून ओळखली जाणारी 'वर्क फ्रॉम होम' संकल्पना अधिक गुंतागुंतीची होत असून काही देशांमध्ये अडचणीची ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आगामी दशकांमध्ये 'वर्क फ्रॉम होम' संकल्पना मोडीत निघून पारंपारिक पद्धतीने नुसार कार्यालयांमध्ये जाऊन काम करण्याची पद्धती सुरू झाली तर आश्चर्य वाटायला नको.

आज जगभरातील लाखो कर्मचारी काम करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य व लवचिकता यामुळे 'वर्क फ्रॉम होम' ही स्वप्नवत संकल्पना राबवत आहेत. प्रत्यक्षात खूप थोडे कर्मचारी त्याचा खराखुरा आनंद घेत असल्याचे आढळते. समाजातील सांस्कृतिक आशाअपेक्षा, व्यवस्थापनाचा मुलतः असलेला विरोध किंवा त्याबाबतची साशंकता, त्यातील अदृश्य खर्चाची दाट गुंतागुंत यामुळे 'वर्क फॉर्म होम' बाबतच्या अपेक्षा व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यात खूप अंतर आहे. त्यामुळेच 'वर्क फ्रॉम होम' एक दुधारी शस्त्राचे फायदे-तोटे स्पष्ट झाले असून 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीतील गुंतागुंत वाढल्याचे दिसत आहे.

भारतासह चीन, जपान, दक्षिण कोरिया आणि अन्य काही देशांमध्ये अजूनही प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन जागेवर काम करणे म्हणजे कंपनीशी निष्ठा, शिस्त आणि गांभीर्य मानले जाते. या अहवालात अमेरिका किंवा कॅनडा, इंग्लंड या देशांमध्ये जे सर्वेक्षण करण्यात आले. तेथील काम गारांना आठवड्यामध्ये किमान १.६० दिवस तर आशिया खंडात १.१ दिवस 'वर्क फ्रॉम होम' करावेसे वाटते. २१ व्या शतकातील कामगारांच्या दृष्टिकोनातून विचार करायचा झाला तर 'वर्क फ्रॉम होम' आधुनिक कामाचे वैशिष्ट्य मानावे लागेल. करोना महामारीच्या आधीपासूनच १९७० च्या दशकात काही देशांमध्ये या संकल्पनेचा प्रारंभ झाल्याचे दिसते. जगातल्या सर्वोत्कृष्ट 'फॉर्च्यून ५०० 'कंपन्या आहेत, त्यातील ८० टक्क्यां पेक्षा जास्त कंपन्या 'वर्क फ्रॉम होम' आणि कंपनीत जाऊन काम करण्याच्या संकरित वेळापत्रकाला म्हणजे हायब्रिड पद्धतीला जास्त प्राधान्य देत आहेत. आठवड्यातील तीन दिवस ऑफिस मध्ये जाऊन काम करावे तर दोन दिवस घरून काम करावे असे त्यांना वाटते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पाहणीनुसार १२ टक्के कर्मचारी, अधिकारी वर्गाला कंपनीत जाऊन काम करण्याची जबरदस्त इच्छा आहे.

या पाहणीत कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' चे फायदे तोटे विचारण्यात आले. करोना महामारी अत्युच्च पातळीवर असल्यापासून गेल्या तीन-चार वर्षात स्थिर होत असलेली कामाची 'हायब्रीड' पद्धत कर्मचाऱ्यांना फायदेशीर झाल्याचे आढळले. 'वर्क फ्रॉम होम' शब्द जगभरात 'रिमोट वर्क' म्हणून ओळखला जातो. 'रिमोट वर्क' साठी आघाडीवर युरोपातील देश असून त्यात एस्टोनिया, स्पेन, पोर्तुगाल, जर्मनी, नेदरलँड्स, अमेरिका, न्युझीलँड, आयर्लंड, बेल्जियम व कॅनडा यांचा समावेश आहे. या देशात डिजिटल पायाभूत सुविधा व्यापक प्रम णात, चांगल्या दर्जाच्या आहेत. मात्र जागतिक पातळीवर या वर फ्रॉम होम किंवा रिमोट वर्क यातील गुंतागुंत मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. आपल्याकडे अजूनही प्रत्यक्ष कामावर हजर असण्याची 'संस्कृती' हट्टीपणाने टिकून आहे. कर्मचाऱ्यांचे आकुंचित होत असलेले राहणीम ान, घरामध्ये 'कामासाठी' ठरवण्यात येणाऱ्या जागेची कमतरता, आणि अविश्वासार्ह इंटरनेट सेवा सुविधा यामुळे शहरातील कर्मचाऱ्यांसाठी वर्क फ्रॉम होम ही पद्धती जास्तीत जास्त अव्यवहार्य किंवा अप्रिय होत असल्याचे या पाहणीत आढळले आहे. कोणत्याही भौगोलिक परिस्थितीपेक्षा या पद्धतीवर मोठे सावट आढळले आहे ते लिंग भेदाचे. आजही अनेक देशांमध्ये घरकाम करणाऱ्या महिलांना वर्क फ्रॉम होम सुविधा जास्त आवडणारी असून पुरुष वर्गाला मात्र त्याची 'अडचण' जाणवत असल्याचे किंवा वाढत असल्याचे दिसते. घरकाम करणाऱ्या महिलांना आठवड्यातून जवळजवळ तीन दिवस तर मुलेबाळे नसलेल्या महिलांना दोन ते अडीच दिवस 'वर्क फ्रॉम होम' करावेसे वाटते. मात्र कुटुंब वत्सल पुरुषांना घरून काम करण्यामध्ये फारशी आवड नसल्याचे आढळले आहे. यामागे सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जगभरातील बहुतेक सर्व कुटुंबातील महिलेला कोणताही मोबदला न मिळता करावे लागणारे घरकाम हा कळीचा मुद्दा आहे. बहुतांश महिलांना घर कामाच्या जोडीलाच नोकरीच्या कामाची साथ मिळाली तर ती निश्चित हवी असते. मात्र नोकरी व घरकाम या दोन्ही पूर्ण वेळच्या भूमिका पार पाडणे ही महिलांसाठी तारेवरची कसरत ठरते असेही आढळले आहे. नोकरी करणाऱ्या पुरुषांची मानसिकता अद्यापही घरकाम करणाऱ्या महिलेला मदत करण्याची किंवा सहकार्य करण्याची नाही हे या पाहणीमध्ये जास्त स्पष्ट झालेले आहे. पुरुषांचा विचार करायचा झाला तर त्यांना स्वतःचे आरोग्य किंवा छंद जोपासता येतात.

# भीषण हल्ल्यातूनच 'ऑपेरेशन सिंदूर'चा जन्म

२२ एप्रिल २०२५ला भारतीय इतिहासातील पाक पुरस्कृत दहशतवादाचे अजून एक रक्तरंजित पान लिहिले गेले. १२ मार्च १९९३, २६नोव्हेंबर २००८ या ऐतिहासिक तारखामध्ये २२ एप्रिल २०२५ या तारखेची भर पडली आणि या दिवसाची आठवण चिरकाल टिकेल. पहलगाम जवळील बैसरण वॅली येथे २५ भारतीय व १ नेपाळी पर्यटकांची धर्म विचारून गोळी घालून हत्या करण्यात आली. या हत्याकांडात २५ हिंदू व एका मुस्लिम घोडेवाल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या भीषण हल्ल्यातूनच 'ऑपेरेशन सिंदूर ' चा जन्म झाला.

योगायोग असा की संसदेत 'ऑपरेशन सिंदूर' वर चर्चा चालू असतानाच पहलगाम हत्याकांड घडवून आणणाऱ्या तीन पाकिस्तानी दहशतवाद्याना 'ऑपरेशन महादेव' दरम्यान भारतीय सुरक्षा यंत्रणानी कंठस्नान घातले आणि 'बदल्याचे' एक चक्र पूर्ण झाले. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यावर हल्ले करून भारतात दहशतवाद घडवून आणणाऱ्या सूत्रधारांत असुरक्षिततेची भावना निर्माण करण्यात भारत यशस्वी ठरला पण प्रत्यक्ष हल्ला करणारे दहशतवादी मात्र मोकाट असल्याने एक प्रकारची 'अपूर्णतेची' भावना भारतीय जन मानसात होती. हल्लेखोरांना यमसदनास पाठवल्यानां हल्ल्यात जीव गमावलेल्या 'हुतात्म्यांच्या' परिवाराना थोडाफार दिलासा जरूर मिळाला असेल. पण हे 'दुष्टचक्र' इथेच थांबेल का? हा भविष्याच्या दृष्टीने एक अनुत्तरित प्रश्न कायम राहणारच आहे.

या अनिश्चित भविष्याची मुळे काश्मीर, भारत, पाकिस्तान यांच्या इतिहासात दडली आहेत. या इतिहासाचा विचार करताना ज्या ऐतिहासिक 'चुकांचा ' उल्लेख प्रामुख्याने वारंवार होतो तसेच ज्या घटनांचा उल्लेख केला जात नाही त्याही घटनांचे 'तटस्थपणे' विश्लेषण करणे आवश्यक वाटते.

१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्या मिळाल्या पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला केला. भारतीय सैन्याने शत्रूला मागे रेटत रेटत पूर्ण काश्मीर टोळीवाल्यांच्या कब्जातून मुक्त करण्याच्या दृष्टीने पावलं टाकली. पण जवाहरलाल नेहरूनी आपल्या मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता एकतर्फी युद्धविराम जारी करून काश्मीरचा प्रश्न 'युनो' मध्ये नेला आणि हेच 'काश्मीर समस्या' म्हणून भारताला जडलेल्या 'कर्करोगाचे' मूळ कारण ठरले. यासाठी जवाहरलाल नेहरू हेच निःसंशयपणे जबाबदार होते. यात त्यांना कुठलाही संशयाचा फायदा दिला जाऊ शकत नाही.

कर्करोग झाल्याचे लक्षात आल्यावर त्यावर 'धातुरमातुर' मलमपट्टी करण्यासाठी जम्मू काश्मीर साठी 'आर्टिकल ३७०' ची उपाययोजना करण्यात आली आणि त्यात '३५ए' या घातक कलमाची औषधंयोजना करण्यात आली. हे कलम संसदेची मान्यता न घेताच घुसडण्यात आले. यासाठी सुद्धा जवाहरलाल नेहरूच पूर्णतः जबाबदार होते. कर्करोग एकदा बळावल्यावर या रोगाचे सम ूळ उच्चाटन करणे शक्य नाही हे लक्षात यायला फार वेळ गेला. यातूनच पाकिस्तानबरोबरच्या कायम स्वरूपी संघर्षाला सुरुवात झाली.

१९६२ मध्ये चीनने भारताविरुद्ध युद्ध पुकारून भारताचा दारुण पराभव केला. अमेरिकेने भारताला शस्त्रपुरवठा चालू केल्या केल्या चीनने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली. अमेरिकेचे हे उपकार भारत विसरू शकत नव्हता.

अमेरिकेच्या या उपकारांच्या ओझ्याखाली भारत (म्हणजेच नेहरू ) अमेरिकेच्या दडपणामुळे काश्मीरचा काही भूभाग पाकिस्तानला बहाल करण्यास राजी झाले होते.(१९६३) आपण झुल्फिकार अली भुत्तोचे आभार मानले पाहिजेत की त्याने पूर्ण काश्मीर मिळवण्याचा हट्ट धरल्याम ुळे ही योजना बारगळली. इथे नेहरूंची चूक होती का? त्यावेळच्या 'आगतिक' परिस्थितीत नेहरुंच्या जागी इतर कोणीही पंतप्रधान असता तरी त्याला नेहरूंसारखाच विचार करावा लागला असता त्याम ुळे नेहरूना पूर्णपणे दोषी ठरवता येत नाही(जरी ही परिस्थिती त्यांच्यामुळेच निर्माण झाली होती तरी) १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर पुन्हा हल्ला करून काश्मीर बळकवण्याचा प्रयत्न केला. लाल बहादूर शास्त्री यांनी नेहरुंच्या चुकांपासून बोध घेऊन थोडी आक्रमकता दाखवली. त्यांनी पश्चिम पाकिस्तानात सैन्य घुसवून पाकिस्तानवर दडपण आणले. या लढाईत भारताने अत्यंत स्ट्रॅटेजिक 'हाजीपीर ' खिंड जिंकली होती पण रशियाच्या दबावाखाली भारताला ती पाकिस्तानला परत करावी लागली. शास्त्रीजी यासाठी बिलकुल तयार नव्हते पण रशियाचा दबाव व आपल्या सहकार्यांचा सल्ला मानून त्यांनी 'जड' अंतःकरणाने 'ताशकंद करारावर सही केली. 'हाजीपीर खिंड जर आपल्या ताब्यात असती तर कदाचित त्यानंतरच्या पाकिस्तानी घुसखोरीला आळा घालता आला असता.

या घोडचचुकीबद्दल इतकी वर्षे झाल्यावर 'शास्त्रीना ' संपूर्णपणे जबाबदार ठरवणे अन्यायकारक ठरेल.एक तर शास्त्रीजी कुठल्याही स्वप्नाळू दुनियेत वावरत नव्हते आणि भारत अंतरराष्ट्रीय राजकारणात रशियावर पूर्णपणे अवलंबून होता. तसेच चीनकडून झालेल्या पराभवाच्या जखमा पूर्णपणे भरून यायच्या होत्या.या परिस्थितीत इतर कुठलाही पंतप्रधान वेगळा वागला असता का?

१९७१ च्या युद्धात पाकिस्तानचा निर्विवाद पराभव होऊन पूर्व पाकिस्तान, पाकिस्तानपासून वेगळा होऊन, स्वतंत्र बांगला देशची निर्मिती झाली. पण इंदिरा गांधींनी सिमला करार करताना ९३००० हजार युद्धकैद्यांच्या बदल्यात पाक व्याप्त काश्मीर का परत घेतला नाही असा प्रश्न विचारला जातो तो चुकीचा वाटतो. १९७१च्या लढाईचा उद्देश बांगलादेश निर्माण करणे हा होता, पी. ओ. के. ताब्यात घेणे हा नव्हता.तसेच द्विपक्षीय वाटाघाटीत युद्धकैद्यांचा सौदयासाठी वापर करू नये हे जिनिवा कराराचे कलम आहे. इंदिरा गांधीची अक्षम्य चूक ही झाली की त्यांनी ९३००० युद्धबंद्याच्या बदल्यात भारताचे पाकिस्तानच्या ताब्यातील ५४ युद्धकैदी सोडवून आणले नाहीत.

१९८३ची विस्मृतीत गेलेली एक घटना जिने काश्मीरच्या राजकारणाला वेगळे वळण लावले तिचा आजकाल उल्लेख होत नाही. जे. के. एल. एफ. चा अतिरेकी मकबूल बट याला फाशीची शिक्षा झाली होती. त्याला सोडवण्यासाठी अतिरेक्यानी भारताचे ब्रिटन एम्बसी मधील अधिकारी रवींद्र म्हात्रे यांचे अपहरण करून हत्या केली पण इंदिराजी बधल्या नाहीत.

मकबूल बटला फासावर चढवले गेले. इंदिरा गांधींचा कणखरपणा कौतुकास्पद होता. १९९०मध्ये विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान होते. त्यावेळी केंद्रीय गृहमंत्री मुफ्ती मोहम्मद सैद यांची कन्या रुबीया हिचे'तथाकथित' अपहरण झाले होते.त्यावेळी तिच्या सुटकेसाठी सहा खुखार आतंकवाद्यांची सुटका केली गेली. ही केंद्र सरकारची 'महाचूक' होती. इथूनच पुढे काश्मीरमध्ये अतिरेक्याना मोकळे रान मिळाले व ते भारताच्या डोक्यावर बसले. हे अपहरण घडवून आणले होते का असा प्रश्न त्यावेळी चर्चीला गेला होता. कै. राजीव गांधींनी त्यावेळी आरोप केला होता की गृहमंत्र्यांच्या मुलीला घरून 'टिफिन' पुरवला जात होता. काश्मीरबाबत नेहमी फक्त नेहरू, इंदिरा गांधींना जबाबदार धरले जाते पण व्ही. पी. सिंग यांचे नाव घेतले जात नाही. खरं म्हणजे व्ही. पी.सिंग यांच्याच काळात काश्मीरची स्थिती हाताबाहेर गेली. काश्मिरी पंडितांचा वंश संहार व पलायन सिंग यांच्याच काळात घडले.या घटनेचा उल्लेख आजकाल केला जात नाही.

वाजपायी पंतप्रधान असताना भारताचे खउ८१४ विमान हैजॅक केले गेले तेव्हा प्रवाश्यांच्या सुटकेच्या बदल्यात अझर मसूद सकट चार धोकादायक पाकिस्तानी अतिरेक्याची मुक्तता करण्यात आली. हा निर्णय भारताच्या सुरक्षेच्या म ुळावर आला. हा निर्णय टाळता आला असता का? हा निर्णय घेतल्याबद्दल वाजपायी सुद्धा जबाबदार ठरतात. मनमोहन सिंग यांच्या काळात सियाचिनचा प्रदेश डी मिलिटरीझ करण्याची कल्पना मांडण्यात आली. त्या वेळचे परराष्ट्र सचिव श्याम सरण यांची ही कल्पना होती. मनमोहनसिंग यांना ही कल्पना पसंत होती पण तेव्हाचे लष्कर प्रमुख जे. जे. सिंग यांनी या प्रस्तावाला कडाडून विरोध केला म्हणून ही कल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. विशेष म्हणजे कारगिल मध्ये पाकिस्तानने केलेला विश्वासघात माहित असून सुद्धा मनमोहन सिंग या प्रस्तावाला राजी झाले होते.काही वर्षांपूर्वी टी. व्ही. वरील चर्चेत खुद्द जे. जे. सिंग यांनी हा खुलासा केला. त्यावेळी शाम सरण यांनाही चर्चेत बोलावले होते पण ते सहभागी झाले नाहीत.

शेवटच्या पाच घटनांचा उल्लेख कोणी केल्याचे फारसे वाचनात आले नाही. वरील सर्व इतिहासाचे ओझे खांद्यावर असह्य झाल्यानेच ते केव्हातरी फेकून दिलेच पाहिजे याच जाणीवेतून 'ऑपेरेशन सिंदूर'ची गरज निर्माण झाली आणि ते यशस्वीपणे अमलात आणले गेले. तरी यानंतर दहशतवादाला आळा बसेल का या प्रश्नाचे उत्तर काळच देईल.

# शिवराणा वाचनालय व नागरी विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने शाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अटल मत प्रतिनिधी)**

थोर साहित्यिक, विचारवंत, कवी, लेखक शाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम शिवराणा वाचनालय व नागरी विकास सेवाभावीसंस्था तसेच शिवराणा सेवा संघ वतीने आयोजित कार्यक्रमात अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रकाश सोनवणे व वसंत पवार यांच्या हस्ते झाले.

यावेळी सुत्रसंचलन व प्रस्तावना एल.डी. ताटू यांनी केली. थोर साहित्यिक विचारवंत अण्णा भाऊ साठे लेखक, शाहिर, कवी, विचारवंत साहित्यिक, चळवळ चळवळीतील नेते, डॉ आंबेडकर यांच्या विचार सरणी वाटेगावकर मुंबईत येऊन कलावंत कला सादरीकरण शेख अमर बरोबर कलापथक साहित्यिक कथा, कादंबरी नाटक, प्रवास वर्णन,



कविता संग्रह प्रकाशित महाराष्ट्र संयुक्त चळवळ चळवळीतील सहभागास प्रमुख होते.


दिड दिवस शाळेत गेले तसं असुरक्षित पण सातासमुद्रापार भरारी घेतली. रशियामध्ये साहित्य कला पोहोचली. या वेळी प्रकाश सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात साहित्य थोर साहित्यिक विचारवंत कवी यांची अजरामर फकीरा कादंबरी वाचावी महान साहित्य दर्शन वैचारिक क्रांती घडवली. यावेळी संयोजक उपस्थित एल.डी. ताटू, सुर्यकांत तुपकर, कारभारी उगले, प्रकाश देशमुख, आर.डी. पवार, सुभाष काथार, राजेश मोरे, संदिप राजपुत उपस्थित होते.

# धर्मतिर्थ क्षेत्रावर ४५ फुट उंचीची सिध्द भगवंताची खडगासन प्रतिमा विराजमान होणार

छत्रपती संभाजीनगर
(अतुल मत प्रतिनिधी)

प्रज्ञायोगी दिगंबर जैनाचार्य गुप्तीनंदी गुरुदेव यांच्या आर्शिवाद व प्रेरणेने धर्मतिर्थ क्षेत्राचे निर्माण कार्य प्रगतीपथावर असुन फेब्रुवारी २०२३ मध्ये ऐतिहासीक पंचकल्याणक संपन्न होवुन धर्मतिर्थ क्षेत्रावर ४५ फुट उंचीची सिध्द भगवंताची मुर्तीचे निर्माण कार्य काही दिवसातच सुरू होणार आहे. ज्या पाषाणापासुन हि मुर्ती निर्माण होणार आहे ते पाषाण सजोत पाली राजस्थान येथुन धर्मतिर्थ क्षेत्रावर येणार आहे.

२४ जुलै रोजी त्याचे प्रस्थान झाले आहे. या पाषाणाची साईज ४२ फुट बाय



१२ फुटची असुन २२५ टन वजनाचे हे पाषाण आहे आणि हि प्रतिमा ज्या कमळावर विराजमान होणार आहे. त्या पाषाणाची साईज १५ फुटबाय ९ फुटअसुन त्याचे वजन सुध्दा ४५ टन आहे. परम गुरु भक्त इंदौर निवासी अनिलकुमारजी गोधा यांच्या वतीने या मुर्ती निर्माण करण्यासाठी विशेष सहकार्य मिळाले आहे. या पाषाणाचे ए.एस. क्लब जवळ, सोलापुर हायवे येथे ५ ऑगस्ट रोजी येण्याची शक्यता आहे.

या पाषाणाचे स्वागत व पुजा करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील राजकीय व सामाजिक कार्यकर्तेची उपस्थिती राहणार आहे. तरी सकल जैन समाजाच्या बांधवांनी पाषाणाच्या स्वागत एवं पुजनासाठी उपस्थित रहावे असे आवाहन धर्मतिर्थ विकास समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर चांदमल पाटणी व महामंत्री पवनकुमार पापडीवाल यांनी केले आहे. तसेच धर्म तिर्थ विकास समितीचे वरीस्ट उपाध्यक्ष संजय पापडीवाल, राजेंद्र पाटणी, शरद जालनापुरकर, सुनिल काला, प्रकाश अजमेरा, चंद्रशेखर पाटणी नेरीवाला, धिरज पाटणी, गुलाबचंद कासलीवाल, जिंतुरकर, सतिष लोहाडे हे यासाठी परीश्रम घेत असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# ध्येयावर लक्ष केंद्रीत करुन वाटचाल करा- सी.ए. राजन मनोज काबरा



छत्रपती संभाजीनगर
(अतुल मत प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया याच्यावतीने में २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सी.ए. अंतिम परीक्षेत देशातून प्रथम आलेल्या उत्रपती संभाजीनगर शहरातील देवगिरी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी राजन मनोज काबरा यांचा आज देवगिरी महाविद्यालयाच्या रविंद्रनाथ टागोर सभागृहात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा. आ.सतीश चव्हाण यांच्या शुभहस्ते भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सी. ए. परीक्षेत अभूतपूर्व यश मिळिवलेल्या राजन काबरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करुन वाटचाल केल्यास निश्चितच यश मिळेल यासाठी विद्यार्थ्यांनी आपले पूर्णत्व देणे गरजेचे आहे. ११ वी, १२ वी बरोबरच सी.ए. चा फाउडेशनचा कोर्स करून म इंड सेट करणे गरजेचे आहे यामुळे मी जाणिवपूर्वक कॉमर्स शाखेची निवड करुन सातत्यपूर्ण अभ्यास केला व सोशल मि डीयाच्या आहारी न जाता माझ्या ध्येयावर लक्ष केंद्रीत केले. त्यामुळे मला हे यश संपादन करता आले. याप्रसंगी आर. जे. अभय गायकवाड यांनी सी.ए. राजन मनोज काबरा यांची मुलाखत घेवून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना अचूक आणि नेमके उत्तरे दिली.

याप्रसंगी आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत राजनने मिळवलेले यश नक्कीच कौतुकास्पद असून उअ परीक्षेची तयारी करणाऱ्या मराठवाड्यातील विद्यार्थ्यांकरिता नक्कीच प्रेरणा देणारे आहे. राजनच्या या घवघवीत यशामुळे देवगिरी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून महाविद्यालयासाठी ही नक्कीच भूषणावह बाब असल्याचे सांगत आमदार सतीश चव्हाण यांनी राजन काबरा यांना पुढील वाटचालीस दिल्या.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक तेजनकर यानी म हाविद्यालयाची वैभवशाली परंपरा सांगून खऱ्या अर्थाने देवगिरी महाविद्यालयाने अगणिक विदयार्थी घडविण्याचे कार्य सातत्याने पार पाडले आहे असे प्रतिपादन केले याप्रसंगी सी.ए. रोहन आचलिया व सी.ए. मनोज कावरा यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. सुरेश लिपाने यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ गणेश मोहिते डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे जेईई नीटचे संचालक प्रा. एन. जी गायकवाड, उपप्राचार्य प्रा. अरुण काटे, उपप्राचार्य उपप्राचार्य प्रा. विजय नलावडे, श्रीमती सुवर्णा काबरा यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आर.जे. अभय गायकवाड यांनी केले तर आभार पर्यवेक्षक प्रा. डी. एल. हिवरे यांनी माडले.

# आयुक्त जी.श्रीकांत वेरूळ यांनी वेरूळ लेणीला भेट



खुलताबाद (अतुल मत प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगरचे महानगरपालिका आयुक्त जी.श्रीकांत यांनी रविवारी (दि.तीन) सहपरिवार वेरुळ लेणी ला भेट देऊन पाहणी केली यावेळी पुरातत्व विभागाचे राजेश वाकलेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.यावेळी त्यांनी ई कार द्वारे लेणी पर्यंतचा प्रवास केला,या ठिकाणी त्यांना छत्रपती संभाजीनगर मधील अतिक्रमण हटाव मोहिमेबद्दल स्थानिक पत्रकारांनी छेडले असता यावर त्यांनी भाष्य करणे टाळले.

# सकल चर्मकार समाजाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना विन्रम अभिवादन

छत्रपती संभाजीनगर
(अतुल मत प्रतिनिधी)

सकल चर्मकार समाजाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी सोनटक्के रविदास महाराज केंद्रीय जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष होते. या वेळी मंचावर जवाहरलाल भगुरे, विनोद पुर्भे, अॅड. संतोष मिमरोट, संतोष लोखंडे, सी.एम. रमणे, महादेव डांबरे, राजू डोंगरे, अशोक बन्सवाल, अॅड. गोरे, आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि क्रांतिकारी कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारसरणीवर भाषणे झाली आणि समाजात



त्यांनी जागवलेली चेतना आजही कशी प्रेरणादायी आहे. यावर वक्त्यांनी भर दिला. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती कार्यक्रमास भरघोस प्रतिसाद दिला.

# अतुल चव्हाण यांनी छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्य अभियंता पदाचा पदभार घेतला



“आपल्या मातीची एक वेगळीच ओढ मनाला असते.. छत्रपती संभाजीनगर हे केवळ ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा नाही, तर विकासाच्या दृष्टीनेही राज्यातील एक महत्त्वाचे केंद्र आहे. या भूमीच्या प्रत्येक रस्त्याला, इमारतीला आणि पायाभूत संरचनेला नवसंजीवनी देण्याची ही सुवर्णसंधी आहे. नागरिकांचे जीवन अधिक सुलभ, सुरक्षित आणि समृद्ध करण्याचा संकल्प घेऊनच हे कर्तव्य स्वीकारले आहे.

– **अतुल चव्हाण**,मुख्य अभियंता, छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक बांधकाम विभाग



# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित अभिवादन



छत्रपती संभाजीनगर
(अतुल मत प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या वतीने आज लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित अभिवादन करण्यात आले. चांदणे चौक येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उप आयुक्त तथा विभाग प्रमुख लखीचंद चव्हाण,संजय सुरडकर,माहिती व जनसंपर्क विभागाचे अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, इंझमाम उल हक आदींची उपस्थिती होती.

# गणुल्या रे गणुल्या

## लहानग्या सानवीने लिहिलं बाप्पासाठी गोड गाणं!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

अवघ्या ९ वर्षांची चिमुरडी, पण भावभावनांनी ओतप्रोत असलेलं मन आणि संस्कारांनी भरलेलं बालपण! गुरुकुल ओलंपियाड स्कूलच्या इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या कुमारी सानवी संजय शिंदे हिने आपल्या लाडक्या गणपती बाप्पावर अगदी गोडसं गाणं लिहून सर्वांचं मन जिंकलं आहे.



'गणुल्या रे गणुल्या, छान गोड गणुल्या... शंकर आणि पार्वतीच्या लाडक्या गणुल्या' अशा तोडक्या-मोडक्याच पण मनाला भिडणाऱ्या शब्दांत सानवीने आपल्या बाप्पावरचं प्रेम व्यक्त केलं आहे. तिचं हे गीत ऐकताना प्रत्येकाला बालपणाची, भक्तीची आणि गणेशप्रेमाची आठवण येते.

सानवीचे वडील जिल्हा परिषदेचे कर्मचारी असून, आपल्या मुलीवर चांगले संस्कार घडवले आहेत. आज लहान वयात अनेक मुले मोबाईलच्या आकर्षणात गुरफटलेली असताना, सानवी मात्र वेगळीच आहे. तिचं बाप्पावरचं प्रेम आणि अभिव्यक्तीची शैली ही खरंच कौतुकास्पद आहे. गणेशोत्सव तोंडावर असताना सानवीसारख्या लहानग्या मुलीचे हे गीत समाजाला सकारात्मकतेचा आणि श्रद्धेचा सुंदर संदेश देत आहे. लहान वयातच एवढी भक्तीभावना आणि सर्जनशीलता असणाऱ्या सानवीचा सर्वत्र गौरव होत आहे. गणपती बाप्पाचं लाडकं रूप अशा छोट्या भाविकांच्या नजरेतून बघायला मिळणं हे खरोखरच आनंददायी आणि प्रेरणादायी आहे.

# ज्ञान संदीप शिक्षण संस्थेतर्फे लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉक्टर आंबेडकर नगर, सिडको एन-७, छत्रपती संभाजीनगर येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे, सचिव. संगीता खिल्लारे, मुख्याध्यापक संदीप सोनवणे हे उपस्थित होते. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर सर्व शिक्षकांनी देखील



प्रतिमांची पूजन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनात घडलेल्या आणि छोटे मोठे किसे विद्यार्थ्यांना सांगितले. त्याचबरोबर लोकमान्य टिळक यांच्या विषयी देखील माहिती सांगितली. तसेच मुख्याध्यापक. संदीप सोनवणे यांनी इंग्रजांविरुद्ध लोकमान्य टिळकांनी कशा पद्धतीने संघर्ष केला हे विद्यार्थ्यांना सांगितले तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या बद्दल देखील मार्गदर्शन केले. शाळेतील इयत्ता पहिली ते दहावी या सर्व वर्गातील दोन -दोन विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर व लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शिक्षकांमधून संजीव चौधरी व वैशाली बागुल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुनील चौधरी, संजीव चौधरी, नजमा खान, विजय पाटील, साहेबराव शिंदे, हर्षल पगारे, वैशाली बागुल, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीची विद्यार्थिनी मोनिका मगरे तिने केले तर आभार खुशी बनकर या विद्यार्थ्यांनी मानले.

# सहकार पुरस्कार प्रस्ताव दि.१८ ऑगस्टपर्यंत मागविले

**छत्रपती संभाजीनगर** – सहकार विकासासाठी भरीव योगदान देणाऱ्या सहकारी संस्थाना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सहकार महर्षी पुरस्कार - १, सहकार भूषण - २१, सहकार निष्ठ -२३ अशा एकूण ४५ संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहे. मराठवाडा विभागातील सर्व सहकारी सुतगिरणी, हातमाग-यंत्रमाग सहकारी संस्थांनी आपले सहकार पुरस्कार प्रस्ताव संस्थेचे मुख्यालय असलेल्या तालुक्याच्या संबंधित सहायक, उपनिबंधक यांचेकडे सोमवार दि.१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे असे आवाहन प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग प्रशांत सदाफुले यांनी केलेआहे.

# भारतीय डाक विभागाच्या IT 2.0 डिजिटल परिवर्तनाचा शुभारंभ 'APT' प्रणालीचा अमल, डाक सेवांमध्ये नवीन युगाची सुरुवात!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

नव्या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या अंमलबजावणीसाठी २ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यमान प्रणाली तात्पुरती बंद राहणार असून, ३ ऑगस्ट २०२५ पासून डेटाच्या स्थलांतर, प्रणाली तपासणी आणि समाकलन प्रक्रिया राबवली जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर १ ऑगस्ट २०२५ भारतीय डाक विभागाने डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत नवीन APT प्रणालीच्या अमलाची औपचारिक घोषणा केली आहे. या परिवर्तनामुळे डाक कार्यालयांची सेवा अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि नागरिकांसाठी सुलभ होणार आहे. दिनांक ४ ऑगस्ट २०२५ पासून छत्रपती संभाजीनगरसह देशभरातील सर्व डाक कार्यालयांमध्ये ही सुधारित प्रणाली लागू केली जाणार आहे. या नव्या डिजिटल प्लॅटफफॉर्मच्या अंमलबजावणीसाठी २ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यमान प्रणाली तात्पुरती बंद राहणार असून, ३ ऑगस्ट २०२५ पासून डेटाच्या स्थलांतर, प्रणाली तपासणी आणि समाकलन (integration) प्रक्रिया राबवली जाणार आहे. परिणामी, ४ ऑगस्टपासून सर्व डाक व्यवहार नवीन प्रणालीद्वारे सुरळीतपणे पार पाडले जातील. APT प्रणालीमुळे डाक व्यवहार अधिक गतिमान, ग्राहकाभिमुख व पारदर्शक होतील. ही प्रणाली आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून, भविष्यकालीन गरजांनुसार डाक सेवांचा विस्तार आणि सेवा वितरणात गती येईल. या बदलाचा उद्देश ग्राहकांना स्मार्ट व जलद सेवा देणे हा आहे. या प्रणालीच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर विभागाने नागरिकांना पूर्वसूचना दिली असून, आवश्यक सेवांचा लाभ घेण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने डाक कार्यालयांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर प्रणालीचा शुभारंभ ४ ऑगस्ट २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील प्रमुख डाकघरात करण्यात येणार असून, या कार्यक्रमाला भारतीय डाक सेवांचे संचालक डॉ. संजीवकुमार व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांमध्ये श्री. मनोजा नांदे, श्री. अमर सिंग, श्री. राजेंद्र बोटलवार, श्री. हरीप्रसाद, श्री. सुरेश बनोटी, श्री. सुनील माणगावकर, श्री. संदीप उपाध्याय, श्री. विनय चामनकर, श्री. भरत गुळवंचे, श्रीमती दीपाली चौधरी, श्री. अनिल लोखंडे यांचा समावेश आहे.

# भारतीय दलित पँथरच्या राज्यस्तरीय कार्यकर्ता मेळाव्यात २६ ठराव पारित

## इतर मागण्यांसह २६ ठरावांची अंमलबजावणी करा अन्यथा आंदोलन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**




जन सुरक्षा विधेयक रद्द करावे अतिक्रमण हटाव मोहिमेअंतर्गत पाडापाडी केलेल्या गोरगरिबांची घरे बांधून देण्यात यावी या व इतर मागण्यां सह २६ ठराव भारतीय दलित पँथरच्या राज्यस्तरीय कार्यकर्ता मेळाव्यात मंजूर करण्यात आले . राज्य व केंद्र सरकारने ठराव याची अंमलबजावणी न केल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा पँथर नेत्यांनी या मेळाव्यात दिला भारतीय दलित पँथरच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय कार्यकर्ता मेळावा रविवारी मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे उत्साहात पार पडला त्यात हे ठराव मंजूर करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर प्रख्यात साहित्यिक व समीक्षक प्राध्यापक डॉ. ऋषिकेश कांबळे भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण भुतकर मार्गदर्शक प्रा. प्रकाशराव सोनवणे जिल्हाध्यक्ष धम्मपाल दांडगे ॲड. सिद्धार्थ गवई सुप्रिय बनसोडे जालन्याचे एजाज खान, सत्तार पटेल परभणीचे गौतम इंगोले जिंतूरचे तालुका अध्यक्ष खंडेराव साळवे वैजापूरचे तालुकाध्यक्ष देविदास जाधव सिल्लोडचे तालुका अध्यक्ष संजय सरोदे वकील आघाडीचे कैलास पवार वसंत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या मेळाव्यास सुरुवात झाली.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले भारतीय दलित पँथरने अनेक सामाजिक लढे लढले नामांतराचा प्रश्न गायरान जमिनी हक्क बेरोजगारी यावर सातत्याने आवाज उठवला कालांतराने पँथरचे शकले उडाल्यानंतर जातीयवादी संघटनांनी डोके वर काढले लक्ष्मण भुतकर यांनी १९९९ ला पँथर स्थापन करून दलित दलितांवर होणाऱ्या अत्याचारावर प्रहार केले. यापुढे आपल्याला आणखी संघटित होऊन आणखी नेटाने संघटना पुढे न्यावी लागणार आहे नामांतरानंतर पुन्हा एकदा आपल्या अस्मिता आणि अस्तित्वासमोर आव्हान उभे राहिले आहे.

आपल्या अस्तित्वाचा व अस्मितेचा लढा नव्याने उभारावा लागेल पँथरचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण भुतकर म्हणाले पँथरने कोणकोणते सामाजिक लढे उभारले हे सांगण्याची आता आवश्यकता नाही १९७२ ला पँथर स्थापन झाल्यानंतर प्रस्थापित नेत्यांनी पँथर फोडली १९९९ ला पुन्हा पँथर स्थापन करून सामाजिक लढे उभारण्याचे काम सातत्याने केले काही मूठभर लोक सत्ताधाऱ्यांच्या दावणीला बांधले गेले पैसे घेऊन मोर्चे काढण्याची जमात आता निर्माण झाली आहे शहरांमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबवून महापालिकेने गोरगरिबांच्या घरावर बुलडोझर फिरवले त्याच वेळी हे तथाकथित दलित नेते मूग गिळून गप्प बसले त्यांना धडा शिकवण्याची वेळ आली आहे त्यानंतरच्या कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन पँथरच्या शाखा स्थापन कराव्यात असे आवाहनही त्यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. प्रकाशराव सोनवणे म्हणाले भारतीय दलित पँथर लढाऊ संघटनेने अनेक सामाजिक आर्थिक प्रश्न सोडविण्याचे काम केले.

विद्यापीठ नामांतर आंदोलनामध्ये अनेक पँथर शहीद झाले परंतु आता आपण संघटित नसल्यामुळे कोणावर धाक राहिला नाही गायरान जमिनीचे प्रश्न दलितांसाठी शिक्षण नोकऱ्या याकडे जातीयवादी पक्षांनी सातत्याने दुर्लक्ष केले आहे त्यामुळे आगामी काळात आपल्याला संघटित होऊन जातीवादी पक्ष सोबत लढावे लागणार आहे यावेळी प्रा.सोनवणे यांनी २६ ठरावाचे वाचन केले त्यावेळी सभागृहातील उपस्थित कार्यकर्त्यांनी एकमताने ठराव मंजूर केले केंद्र राज्य सरकारने ठरावाकडे डोळे झाक केले तर राज्यभरात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही यावेळी पँथर नेत्यांनी दिला या मेळाव्यात गुणवंत विद्यार्थी महिला बचत गट शासकीय कर्मचारी अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध भीम गायिका कडूबाई खरात आणि कुणाल वराळे, सरलाताई तायडे यांचाही सन्मान करण्यात आला या मेळाव्यास जिल्हाध्यक्ष धम्मपाल दांडगे, दशरथ कांबळे, समाधान कस्तुरे, गौतम सोनवणे, राजानंद नवतुरे, ॲड. सतीश राऊत, युवा नेते अमोल भुतकर, सुमित्राबाई कासारे, पार्वतीबाई घोरपडे, गीताबाई मस्के, दैवशाली झीने यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199